**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १६३ वा | गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# महाराष्ट्रातल्या राजकारणातील ‘दादा’ पर्वाचा करुण अंत

## भीषण विमान अपघातात अजित पवारांचे निधन, महाराष्ट्रावर शोककळा

## दादांच्या पार्थिवावर आज सकाळी अंत्यसंस्कार; मोदी-शाह उपस्थित राहणार

### घातपाताची शक्यता राज्यभरात नागरिकांतून चर्चा

### विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशीची मागणी



**बारामती (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. अजित पवार बारामतीच्या दौऱ्यावर असताना ही घटना घडली. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी अजित पवार आज बारामतीमध्ये दाखल होणार होते.

विमान लँडिंग वेळी हा अपघात झाला. या दरम्यान, मोठी बातमी समोर आली आहे. डीजीसीएने दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात ५ प्रवाशांचा मृत्यू झाला.

अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला आहे. या विमान अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती DGCA कडून देण्यात आली आहे. अजित पवार यांच्या विमानाचा लॅण्डिंगआधी भीषण अपघात झाला. बारामतीमध्ये हा अपघात झाला. या अपघातात अजित पवार गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीनं रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. एका शेतात हे विमान लॅण्डिंगदरम्यान कोसळलं आहे.

**शेतामध्ये विमान कोसळलं**

दरम्यान, बारामती विमानतळाजवळील एका शेतामध्ये विमान कोसळलं आहे. हा अपघाता 9 ते 9.15 दरम्यान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आलीय. अपघातग्रास्त विमान आगीतपूर्णपणे खाक झाले. विमान अपघातामध्ये पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डीजीसीएने दिली आहे.



**अजित पवार यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात**

अजित पवार यांचं पार्थिव आता बारामतीत विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात ठेवण्यात येत आहे. अजित पवार यांना अखेरचं पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात जमली आहे. अजित पवार यांना बारामतीच्या मेडिकल कॉलेजमधून विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात नेण्यात येत आहे. रुग्णालयाच्या बाहेर देखील मोठी गर्दी जमली आहे. अजित दादा अमर रहे, अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून केल्या जात आहेत. अनेक कार्यकर्त्यांचा आक्रोश सुरु आहे. अनेक दिग्गज नेते ढसाढसा रडत आहेत. अजित पवार हे पक्षाचे प्रमुख होते. त्यांनी दाखवलेल्या दिशेकडे पाऊल ठेवून नेते राजकारण करत होते. त्यामुळे आम्ही पोरके झालो, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादीचे नेतेमंडळी देताना दिसत आहेत.

## महाराष्ट्रात ३ दिवसाचा दुखवटा








**समर्थकांना अश्रू अनावर**

बारामतीतील रुग्णालयात मोठा जणसमुह पहायला मिळाला. अजित पवार यांच्या समर्थकांना अश्रू अनावर झाले. तर अनेक मोठे नेते रुग्णालयात दाखल होत आहे. सुप्रिया सुळे देखील दिल्लीवरून रवाना झाल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूची बातमी समोर येताच संपूर्ण राज्याला मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांचे खंदे समर्थक समजले जाणारे आमदार अमोल मिटकरी यांना अश्रू अनावर झाले. रडता रडता ते गाडीतून बारामतीला रवाना झाले आहेत.

**'हा निव्वळ अपघात, यात राजकारण नाही'- शरद पवार**



"महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं अपघाती निधन झालं. महाराष्ट्राला हा प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्वान नेत्याला महाराष्ट्र आज मुकला आहे. हे जे नुकसान झालं ते भरुन निघणारं नाही. मी आज मीडियासमोर येणार नव्हतो. पण काही जणांनी या अपघातामागे काही तरी राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका घेतली. याच्यात राजकारण नाही. हा निव्वळ अपघात आहे. त्याच्या यातना महाराष्ट्राला आणि आम्हा सर्वांना होत आहेत. कृपा करुन इथे राजकारण नाही एवढंच सांगायचं आहे", असं शरद पवार म्हणाले.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भावना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत म्हटले की, "अजित पवार जी हे जनतेचे नेते होते, ज्यांचा तळागाळातील लोकांशी घनिष्ठ संबंध होता. महाराष्ट्राच्या जनतेची सेवा करण्यात अग्रेसर असलेले एक मेहनती व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा सर्वत्र आदर केला जात असे. प्रशासकीय बाबींची त्यांची समज आणि गरीब व वंचित लोकांना सक्षम करण्याची त्यांची तळमळ उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक आहे. त्यांच्या कुटुंबियांना आणि असंख्य चाहत्यांना माझ्या संवेदना. ओम शांती."

**नितीन गडकरी यांनी व्यक्त केला शोकः ‘महाराष्ट्राच्या विकासाचा आधारवड हरपला’**

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी म्हटले की, "अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्रातील बारामती येथे झालेल्या दुःखद विमान अपघातामुळे मी व्यथित झालो आहे. या अपघातात ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्या सर्वांसोबत माझ्या संवेदना आहेत. या गहन दुःखाच्या क्षणी शोकाकुल कुटुंबांना सामर्थ्य आणि धैर्य मिळो, अशी प्रार्थना करतो."





## महाराष्ट्राच्या राजकारणातला ताकदवान चेहरा

22 जुलै 1959 साली जन्मलेले अजित पवार यांचा राजकारणात मोठा दबदबा होता. 1982 साली त्यांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला. अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक असे नाव होते ज्यांनी अनेक दशकं सत्ता आणि संघटना दोन्हीवर मजबूत पकड राखली. अजित पवार यांनी 1982 मध्ये राजकारणात प्रवेश केला आणि महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात लवकरच स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांचे काका शरद पवार यांच्यासोबत त्यांनी काँग्रेस पक्ष आणि नंतर फुटलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. भल्या पहाटे उठून काम करणाऱ्या नेत्यांमध्ये अजित पवार यांचं हमखास नाव घेतलं जायचं. 7 वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा रेकॉर्ड त्यांच्या नावे होता. प्रशासनावर असलेला त्यांचा वचक आणि राजकारणतला त्यांचा दबदबा सर्वश्रुत होता.




**शरद पवार यांच्या सरकारमध्ये मिळाली मोठी जबाबदारी**

1993 साली शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा अजित पवार यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यानंतरही ते सरकार आणि संघटनेत महत्त्वाच्या भूमिका बजावत राहिले. 2010 मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस युती सरकारमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अजित पवार यांचा राजकीय लौकिक आणखी वाढला. या काळात ते राज्याच्या राजकारणातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक बनले. राजकारणाव्यतिरिक्त, अजित पवार यांचा सहकार क्षेत्रातही मोठा प्रभाव होता. ते महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांशी संबंधित होते आणि पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. ते महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांशी संबंधित होते आणि पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

**जुलै 2023 पुन्हा सांभाळली उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी**

अजित पवार यांनी जुलै 2023 पासून पुन्हा एकदा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. या भूमिकेत त्यांनी पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात आपले निर्णायक अस्तित्व प्रस्थापित केले. गेल्या चार दशकांहून अधिक काळ राजकीय अनुभव असलेले अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक कुशल रणनीतीकार आणि मजबूत प्रशासक मानले जात होते.



**अजित पवारांच्या निधनानं महाराष्ट्रात ३ दिवसाचा दुखवटा**

अजित पवारांच्या निधनावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अजित पवारांसारखे नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासात ते महत्त्वपूर्ण योगदान देत होते, त्या काळात त्यांचे निघून जाणे हे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारे आहे. माझ्यासाठी दमदार, दिलदार मित्र सोडून गेला आहे. त्यांच्या कुटुंबावर हा प्रचंड मोठा आघात आहे. मी, एकनाथ शिंदे लवकरच बारामतीकडे निघणार आहे. पंतप्रधान, गृहमंत्री यांना फोनवर घटनेची माहिती दिली आहे. त्यांनाही हा धक्का होता. त्यांनी प्रचंड दुःख व्यक्त केले. पुढच्या सर्व गोष्टी कुटुंबाची चर्चा करून ठरवण्यात येतील असं फडणवीसांनी सांगितले.

तसेच माझं सुप्रिया सुळे, पार्थ पवारांशी बोलणे झाले. संपूर्ण कुटुंब बारामतीला पोहचल्यानंतर त्यांच्या संमतीने सगळे निर्णय घेतले जातील. आज शासकीय सुट्टी दिली आहे. राज्यात ३ दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात येत आहे. पुढच्या सर्व बाबींची कल्पना लवकरच देण्यात येईल. अजित पवारांचे जाणे हे कधीही भरून न येणारे हे नुकसान आहे. महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यानंतर जी पोकळी तयार होते ती भरून काढणे अतिशय कठीण आहे. इतक्या सोबत, इतक्या जवळून संघषार्तून आम्ही काम केले आहे. त्यामुळे या घटनेवर विश्वास ठेवायला मन तयार नाही असं सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गहिवरले.

## संपादकीय

# अजितदादा निशब्द...!

# अजित दादांचा राजकीय जीवन प्रवास...

अगदी धडाडीचे नेते म्हणून अजित पवारांची देशभरात ओळख होती. अजित पवारांची राजकीय कारकीर्द मात्र वाखाणण्याजोगी राहिली. अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे झाला. बी. कॉम झालेल्या अजित पवारांनी शेती व्यवसाय सांभाळत राजकारणात प्रवेश केला. ते लोकसभा सदस्य, सात वेळा विधानसभा सदस्य, विविध खात्यांचे मंत्री आणि अनेक वेळा उपमुख्यमंत्री राहिले. वित्त, नियोजन, ऊर्जा, जलसंपदा, ग्रामीण विकास यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी प्रभावीपणे हाताळली. त्यांच्या कार्यकाळात पाणी व्यवस्थापन, ऊर्जा प्रकल्प आणि आर्थिक नियोजन यांना विशेष महत्त्व देण्यात आले. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड आणि झटपट निर्णयक्षमता यामुळे त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

अजित पवारांची राजकीय कारकीर्द ही चढ-उतारांनी भरलेली, पण तितकीच प्रभावी ठरलेली होती.

भल्या पहाटे कामाला सुरुवात करणारा, फाईल्सवर थेट निर्णय घेणारा आणि कठोर प्रशासक अशी अजित पवारांची प्रतिमा होती. अजित पवार यांनी १९८२ साली स्थानिक राजकारणातून आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात केली. बारामती परिसरात त्यांनी संघटनात्मक बांधणी करत जनतेशी थेट संपर्क साधला. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा



लोकसभेवर निवडून गेले आणि खासदार म्हणून संसदेत पोहोचले. या टप्प्यावरच त्यांची ओळख एक आक्रमक आणि अभ्यासू नेता अशी झाली. १९९३ साली शरद पवार मुख्यमंत्री असताना अजित पवार यांना मंत्रिमंडळात संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी जलसंपदा, अर्थ, नियोजन यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळत प्रशासनावर आपला ठसा उमटवला.

विशेषतः सिंचन प्रकल्प आणि सहकार क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेमुळे ते कायम चर्चेत राहिले. पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षपद आणि साखर कारखान्यांशी असलेला त्यांचा संबंध यामुळे ग्रामीण भागात त्यांचा प्रभाव अधिक वाढला. २०१० मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारमध्ये अजित पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती झाली आणि यानंतर त्यांच्या राजकीय कारकीर्दीला नवे वळण मिळाले. पुढील काळात वेगवेगळ्या राजकीय समीकरणांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

सात वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदवला गेला, जो महाराष्ट्राच्या राजकारणात दुर्मिळ मानला जातो. जुलै २०२३ पासून त्यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारत राज्याच्या राजकारणात आपले निर्णायक अस्तित्व सिद्ध केले. युती सरकारच्या काळात आलेली लाडकी बहीण योजनेमुळे देखील अजित पवार आपल्या लाडक्या बहिणींच्या मनात घर करण्यास समर्थ ठरले. पवारांचे गुलाबी जॅकेट देखील त्याकाळात मोठा चर्चेचा विषय ठरले होते. चार दशकांहून अधिक काळाचा अनुभव, रणनीतीची जाण आणि संघटनात्मक ताकद यामुळे अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील 'सिक्सर' खेळणारे नेते मानले जातात. गेल्या चार दशकांहून अधिक काळ राजकीय अनुभव असलेले अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक कुशल रणनीतीकार आणि मजबूत प्रशासक मानले जात होते. विशेष बाब म्हणजे ज्या बारामतीमधून त्यांची सुरवात झाली त्याच बारामतीतमध्ये त्यांची प्राणज्योत मालवली.

सगळ्यांच्या मनात दादा हे स्थान निर्माण करणारे नेतृत्व मात्र आज मातीआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने पुन्हा एकदा महाराष्ट्राने मोठा चेहरा गमावला आहे. दादांच्या पावन स्मृतींना कोटी कोटी विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली...

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

# पंढरपुरात शिवसेनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती येथे विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने सबंध महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून

बुधवारी पंढरपुरात शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुक प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाल्याचे वृत्त समजताच शिवसेनेकडून सर्व कार्यक्रम रद्द करून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिवसेनेच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारे राज्यातील महत्त्वाचे नेते होते. सडेतोड देहबोली आणि जातीपातीचा विचार न करता काम करणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

आजचा दिवस हा काळा दिवस असून देशातील नागरिकांच्या मनाला चटका लावणारा दिवस ठरला असल्याचे सांगत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठे यांना अश्रू आणावर झाले होते.

यावेळी अनेकांनी अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देऊन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. याप्रसंगी टाकळीचे माजी सरपंच संजय साठे, आरपीआयचे नेते आप्पासाहेब जाधव, शिवसेना टाकळी जिल्हा परिषद गटाचे उमेदवार दीपक चंदनशिवे, राष्ट्रवादीचे खर्डी गणाचे उमेदवार शत्रुघन रणदिवे, शिवसेनेच्या टाकळी गणाच्या उमेदवार रोहिणी साठे, सूर्यकांत भोसले, माणिक सय्यद यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवर भीषण अपघात तिघांचा जागीच मृत्यू, एक महिला गंभीर जखमी





**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी- कुडूर्वाडी रोडवर तांबवे गावच्या हद्दीत विटभटीजवळ भरधाव एस टी बसने कारला समोरासमोर जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

बुधवारी (दि. 28 जानेवारी 2026) दुपारी सुमारे 2.45 वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे फलटण व कोळकी परिसरात शोककळा पसरली आहे.

या बाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. 48/2026 नुसार भा.न्या.सं. 2023 चे कलम 281, 106(1), 125(ब), 324(5) तसेच मोटार वाहन अधिनियम कलम 184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात अनिल जगन्नाथ यादव (वय 50, व्यवसाय – सलून व्यवसाय, रा. निमगाव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

फियार्दीतील माहितीनुसार, सुराज्य तालमीचे

उस्ताद बाळासाहेब महादेव काशिद (वय 57),

सनिता काशिद (वय 50) — दोघे रा. बुवासाहेब नगर, कोळकी, ता. फलटन, जि. सातारा तसेच शारदा संभाजी राऊत (वय 65) व मुक्ताबाई कल्याण राऊत (वय 70) — दोघी रा. तावशी, ता. इंदापूर, जि. पुणे हे सर्वजण माढा येथून टेंभुर्णीकडे मारुती सुझुकी बलेनो (क्र. एमएच 11 सी.जी. 9066) या कारमधून प्रवास करत होते.

दुपारी सुमारे 2.45 वाजता तांबवे गावच्या हद्दीत विटभटीजवळ टेंभुर्णीकडून येणाऱ्या एस टी बस क्रमांक एमएच 14 एमएच 0198 वरील चालक जोतीराम भीमराव जाधव (रा. गीता नगर, पणदारे, पुणे) याने आपल्या ताब्यातील एस टी बस ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवली. समोरील वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात त्याने बसचे तोंड रस्त्याच्या बाहेर काढल्याने समोरून येणाऱ्या बलेनो कारला समोरासमोर जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत सुराज्य तालीमचे उस्ताद पैलवान बाळासाहेब काशिद, सनिता काशिद आणि शारदा संभाजी राऊत हे तिघे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मृत्यूमुखी पडले. तर मुक्ताबाई कल्याण राऊत या गंभीर जखमी असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एस टी बस क्रमांक एमएच 14 एमएच 0198 चे सुमारे 1 लाख 50 हजार, तर बलेनो कार क्रमांक एमएच 11 सी.जी. 9066 चे सुमारे 50 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी बस चालक जोतीराम भीमराव जाधव याच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहेकॉ/976 देवकर यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी करत आहेत.

# श्री शंकर बटगिरी यांचा सुपुत्र चि. निखिल चा शुभविवाह थाटामाटात संपन्न झाला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुर शहर व पुर्व भागातील प्रतिष्ठित घराणे म्हणुन शंकर बटगिरी परिवार ओळखले जातात.

नुकतेच झालेल्या सोलापुर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक मध्ये शंकर बटगिरी यांनी शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षाकडुन निवडणुक लढवलेली होती.

शंकर बटगिरी यांचा सुपुत्र चि. निखिल याचा विवाह जुना घरकुल येथील सानी परिवारातील चि.सौ. कां. अमृता हिचाशी रविवारी दूपारी अतिशय थाटामाटात संपन्न झाला.

यावेळी वधू वरांना आर्शिवाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी मोठया संख्येनै उपस्थित हौतै.

लग्न समारंभात आलेल्या सर्व पाहूणे मंडळीना जेवणासाठी खास केरळ पद्धतीचे चविष्ठ जेवण व गोड पायसम बनविण्यात आली होती. जेवण बनविण्यासाठी केरळ येथुन आचारी बोलविण्यात आली हौती.

तसैच, श्री स्वामी समर्थ देवस्थान चे अध्यक्ष महेश इंगळे यांनी नव वधु वर साठी सेवका कडुन पाठवुन दिलेल्या श्री स्वामी



समर्थचा कृपा वस्त्र व विभूती देऊन वधु वरांना शुभ आर्शिवाद देऊन सत्कार करण्यात आला.

या विवाह सोहळयास ज्येष्ट बंधु विनायक बटगिरी यांचा मार्गदर्शनाखाली विवाह सोहळयाचे भव्य दिव्य व उत्तम नियोजन करण्यात आली.

यावेळी नगरसेवक प्रथमेश कोठे, नगरसेवक सतीश सिरसुल्ला, नगरसेवक दासरी, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल बापु शिंदे, शिवसेना नेते श्रीनिवास संगा, सुरेश कोकटनुर, कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था विश्वस्त नागेश टंकसाळ, उद्योजक नारायण गडगी, यंत्रमाग उदयोजक वैंकटेश बोल्ली, हैल्थकेअर मार्केटिंग अध्यक्ष, श्री नीलकंठेश्वर शिक्षण संस्था संचालक व श्रीमद् वीरशैव कुरहिनशेट्टी ज्ञाती संस्था खजिनदार , व शिवशंभो ब्लड बॅक चे संचालक श्रीनिवास बंदगी, श्री संजीवनी हॉस्पिटल चे संचालक दत्ता शिंदे, उदजोक रेणूराजा द्यावरकोंडा, ज्येष्ट समाज बांधव तुळशीदास बटगिरी व दतात्रय मिठ्ठा, नीलकंठेश्वर सोशल फाउंडेशन चे प्रेसिंडेट सुनिल धूळम, अध्यक्ष नरसिंग म्हंता, लखन रुमांडला, लखन मिठ्ठा, महेश आडकी, श्रीनिवास बटगिरी व श्री नीलकंठेश्वर युवा प्रतिष्ठान चे प्रमूख निकेश पोगुल, संस्थापक अनिल बंदगी यांचासह इतर मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

वधु वरांना आर्शिवाद देण्यासाठी सूरत, अहमदाबाद, हैद्राबाद, मूंबई , महिबुब नगर येथील पाहुणे मंडळी मोठया संख्येनै उपस्थित होते,

# एन. के. किड्स स्कूल आता सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बाळे राजेश्वरी नगर येथील एन. के. किड्स स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. एल.के. जी. वगार्चे पालक सचिन पिसके व शुभांगी पिसके यांनी शाळेला अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची भेट दिल्याने आता संपूर्ण शाळा परिसर सीसीटीव्हीच्या सतत देखरेखीखाली राहणार आहे.

हा सीसीटीव्ही संच सौरऊर्जेवर चालणारा असून त्यामध्ये उच्च दर्जाचे तीन डिजिटल कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांद्वारे शाळा परिसरातील सर्व हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार असून कोणत्याही अनुचित अथवा संशयास्पद प्रकारांना आळा बसणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनाही सुरक्षिततेचा मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रसंगी खंडोबा देवस्थानचे चेअरमन विनय ढेपे, राजाभाऊ आलुरे, विकास कस्तुरे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत, सेविका संगीता हेगडकर यांच्यासह शाळेतील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या वतीने या सामाजिक उपक्रमाबद्दल सचिन पिसके व शुभांगी पिसके यांचे मनापासून आभार मानण्यात आले. पालकांच्या सहकायार्मुळे शाळेत सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरण निर्माण करण्यास बळ मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## माढ्यात भाजपच्या सावंतांसाठी उद्धवसेनेची माघार

# कुठे दोन्ही राष्ट्रवादी, कुठे दोन्ही सेना एकत्र

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीच्या माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. माढ्यात नुकतेच भाजपमध्ये दाखल झालेले पृथ्वीराज सावंत यांच्यासाठी उध्दवसेना व राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या उमेदवारांनी माघार घेतली तर अक्कलकोटमध्ये उध्दवसेनेच्या तालुकाप्रमुखांनी राजीनामा देऊन भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला.

त्यामुळे काही ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी तर काही ठिकाणी दोन्ही सेना एकत्र आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद सदस्यपदासाठी उमेदवारी दाखल केलेल्या ३६ उमेदवारांनी तर पंचायत समिती सदस्यपदासाठी दाखल केलेल्या ६२ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ. आर. शेख यांनी दिली.

आता निवडणुकीच्या



आखाड्यात जिल्हा परिषदेच्या ६ जागांसाठी १६ तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ३६ असे एकूण ५२ उमेदवार राहिले आहेत. एकंदरीत तालुक्यात किरकोळ अपक्ष वगळता भाजप विरुद्ध शिंदेसेना अन उद्धवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात थेट लढत होणार हे स्पष्ट झाले आहे.

### असे आहे चित्र

आता निवडणुकीच्या मैदानात जिल्हा परिषदेसाठी भाजप ६, राष्ट्रवादी (अजित पवार) ३, शिंदेसेना २ आणि उद्धवसेना १, रासप २ आणि दोन अपक्ष उमेदवार मैदानात आहेत. पंचायत समिती १२ जागांसाठी भाजप १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ८, शिंदेसेना ४, काँग्रेस १ तर उर्वरित रासप आणि अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. अपक्ष किंवा इतर पक्षांचे उमेदवार असले तरी खरी लढत ही आमदार दिलीप सोपल विरुद्ध राजेंद्र राऊत या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यात होणार आहे.

### एका निंबाळकरांची माघार दुसऱ्या निंबाळकरांना लाभ

जिल्हा परिषदेच्या पानगाव गटातून विकास जाधव, बहुतांश अपक्ष आणि पक्षाच्या मुख्य उमेदवाराला पूरक म्हणून अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत. दोन्ही गटांत एकही उमेदवाराने बंडखोरी केली नाही.

सासुरे पंचायत समिती गणातून अपक्ष अर्ज दाखल केलेल्या माजी जिल्हा परिषद सदस्य मकरंद निंबाळकर यांनी त्यांचा अर्ज मागे घेतला आहे. त्यामुळे भाजपचे संतोष निंबाळकर यांना त्याचा फायदा होणार आहे. मात्र निवडणुकीच्या रणांगणात मतदार काय निर्णय घेणार याकडे लक्ष आहे.

### राष्ट्रवादी (अ.प.) च्या साठेंसह उध्दवसेनेच्या तिघांची माघार

माढा तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जिल्हा परिषद ७ जागेसाठी २० तर पंचायत समिती १४ जागेसाठी ५० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. जिल्हा परिषदेच्या ५० इच्छुकांनी माघारी घेतली आहे. तर पंचायत समितीच्या ११० उमेदवारांकडून माघार घेण्यात आली आहे. माढ्यात चार ठिकाणी भाजप, दोन्ही राष्ट्रवादी तर बेंबळे येथे उद्धवसेना-भाजप अशी प्रमुख राजकीय पक्षांमध्ये लढत पाहायला मिळणार आहे. करमाळा मतदारसंघातील गट व गणात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटात निवडणूक रंगली आहे.

राष्ट्रवादी (श.प.) ५ जागा, 3 राष्ट्रवादी (अ.प.) ४ जागा, शिंदेसेना १ जागा, वंचित बहुजन आघाडी २ जागा, अपक्ष ३, रासप १ जागवेर निवडूक लढवत आहेत. यामध्ये भोसरे व कुई गटात दोन्ही राष्ट्रवादीत लढाई होत आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या गटाकडून एकत्रित निवडणूक लढवण्याचा निर्णयामुळे माढा मतदारसंघात दोन्ही राष्ट्रवादीला फायदा होताना दिसत आहे. पंचायत समितीच्या १४ जागेसाठी भाजपकडून ९, राष्ट्रवादी (श.प.) ६, राष्ट्रवादी (अ.प.) ९, शिंदेसेना ३, उद्धवसेना ४, वंचित बहुजन आघाडी ५, काँग्रेस १, रासप १, अपक्ष १२ उमेदवार निवडणूक आखाड्यात आहेत.

# कांद्याच्या वाढलेल्या आवकामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि हतबलपणा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी तब्बल ८३६ ट्रक कांद्याची आवक झाली. यामुळे मार्केट यार्ड परिसरात यावेळी दिवसभर व रात्रीही बाहतूक खोळबंली होती.

आवक वाढल्याने कांद्याचे दरही कोसळल्याने शेतक-यांतून नाराजी व्यक्त होत आहे. यंदाच्या हंगामातील ही सर्वाधिक आवक ठरली आहे. त्यामुळे बाजार समिती परिसरात कांदा घेऊन आलेल्या वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. तर आवक अधिक असल्याने बाजार समितीमध्ये कांदा उत्तरविण्यास वेळ लागला. त्यामुळे लिलाव प्रक्रियेला ही उशीर झाला.

यंदाच्या हंगामातील नवा कांदा सध्या बाजारात यायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे बाजार समितीमध्ये कांद्याची आवकसातत्याने वाढत चालली आहे. त्यामुळे लिलाव उशिराने सुरू झाली होती. त्यामुळे शेतकरी हतबल झाले होते. बाजार समितीत चांगल्या प्रतिच्या कांद्याला प्रति क्विंटल २२०० तर सर्वसाधारण कांद्यालाकिमान ९०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळत आहे. काद्यांच्या दरात गेल्या महिनाभरात तब्बल दोन ते अडीच हजाराने घसरण झाली आहे. त्यामुळे उत्पादन खर्च ही निघत नसल्याने शेतकयांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

शनिवारी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तब्बल ८३६ ट्रकमधून सुमारे ८३ हजार ६३३ क्विंटल कांद्याची आवक झाली होती.



त्यामधून तब्बल ७ कोटी ५२ लाख ६९ हजार रुपयांची उलाढाल कांदा बाजारात झाली होती.

रविवारी शासकीय सुट्टी आणि सोमवारी प्रजासताक दिनाची सुट्टी आल्याने शनिवारी कांद्याची मोठी आवक झाली होती. त्यामुळे कांदा घेऊन आलेल्या वाहनाच्या रांगा बाजार समितीच्या बाहेर ही लागल्या होत्या. अशी माहिती बाजार समिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## बेताल बोल

### दादा

काळाने डाव साधला
आणि जरी केले चीत...
तुम्ही तर ऱ्हदयातले
दादा कायम अजित...
परखड, दमदार आणि
रोखठोक छाप संपली...
सुन्न झाले मन आणि
साश्रू नयनांनी श्रद्धांजली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अकलूज येथे प्रचाराच्या शुभारंभाची सभा बदलली शोक सभेत

## मोहिते पाटील गटाकडून अजित पवारांना श्रद्धांजली




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील शिवरत्न बंगल्यावर आज दि. 28 जानेवारी रोजी सकाळी 9 वाजता मोहिते पाटील गटाच्या जि. प. व पं. स. उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात येणार होता. सभेची पूर्ण तयारी झाली होती. माळशिरस तालुक्याच्या कानकोपऱ्यातून कार्यकर्ते हजर झाले होते. पण तेवढ्यात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी येऊन धडकल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला. प्रचार सभा रद्द होऊन तीचे रूपांतर शोक सभेत झाले.

आम्ही वेगळ्या पक्षात असलो तरी मोहिते पाटील परिवार आणी पवार परिवाराचे ऋणानुबंध अतिशय जुने आहेत. मागील चार दिवसांपूर्वीच सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणा विषयी आम्ही त्यांची भेट घेऊन आलो होतो. आम्ही मागील काही काळा पूर्वी सोलापूर ते इंदापूर असा एकाच गाडीतून प्रवास केला होता. अतिशय शिस्तप्रिय, हुशार आणी धडाडीचे नेते म्हणून अजित पवार राज्याच्या राजकारणात अजित पवार यांची ओळख होती. त्यांच्या जाण्यामुळे महाराष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे असे विचार खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण करताना व्यक्त केले.

एक राजकारण धुरंधर, मुत्सद्दी आणी खमक्या नेता म्हणून अजितदादांची सगळ्या महाराष्ट्राला ओळख होती. मोहिते पाटील परिवाराचे पवार परिवाराशी तीन पिढ्याचे संबंध होते. राजकारणात जरी पक्ष बदलले गेले असले तरी आमचे वैयक्तिक संबंध कधी दुरावले नाहीत. अजित दादांच्या जाण्यामुळे महाराष्ट्राचा एक कणखर नेता गेला आहे. आमच्या घरातील एक व्यक्ती गेली असल्याचे दुःख आम्हास झाले असल्याचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी म्हटले. श्रद्धांजली अर्पण करताना रणजितदादाचा कंठ दाटून आला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार हे एक खंबीर नेते होते. महाराष्ट्राच्या राजकारणाचा सारिपाट त्यांच्याशिवाय अपूर्ण आहे. राज्याच्या राजकारणात त्यांनी अनेक महत्वाची पदे भूषवली आहेत. शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक यांच्यासाठी त्यांनी भरीव काम केलेले आहे. त्यांच्या जाण्यामुळे देशाचे खूप मोठे नुकसान झाले असल्याचे सांगत आमदार उत्तमराव जानकर यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.

यावेळी जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, ॲड. प्रकाश पाटील, हरिभाऊ मगर, संग्रामसिंह जहागीरदार यांच्यासह शिवसेना उबाठा, शिवसेना शिंदे, रिपब्लिकन पार्टी, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार, अनेक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते.

अकलूज येथील प्रचार शुभारंभा नंतर निमगाव येथे मोहिते पाटील गट व मित्र पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारा निमित्त आमदार भरतशेठ गोगावले यांची प्रचारनिमित्त जाहीर सभा घेण्यात येणार होती. ती ही रद्द करण्यात आली आहे. अजित पवारांच्या अपघाती मृत्यूची बातमी समजताच अकलूज परिसरातील बाजारपेठ उत्स्फूर्तपने बंद करण्यात आली.

# कौठाळी येथील सोलार प्लांटवरील चोरीचा पर्दाफाश

## १०.७८ लाखांचा मुद्देमाल जप्त; ५ आरोपी ताब्यात



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने मौजे कौठाळी (ता. उत्तर सोलापूर) येथील सोलार प्लांटवर झालेल्या मोठ्या चोरीच्या गुन्ह्याची उकल करत एकूण १० लाख ७८ हजार १३० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणात ५ संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, २ विधिसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग उघडकीस आला आहे.

कौठाळी ते वैराग रस्त्यावर पुरुषोत्तम प्रोफाईल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून सोलार प्लेटपासून वीज निर्मितीचे काम सुरू आहे. या ठिकाणी कॅबिनसमोर ठेवलेले ८ लाख ७८ हजार १९० रुपये किमतीचे सोलार प्लेट व पॅनल स्ट्रक्चर अँगल हे दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११ ते १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० या कालावधीत अज्ञात व्यक्तींनी चोरून नेल्याची फिर्याद आदित्य भाऊसाहेब जाधव (रा. शारदादेवी नगर, मोहोळ रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांनी दिली होती. त्यानुसार दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास पोना अनंत चमके यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे कौठाळी येथे शोधमोहीम राबवण्यात आली. मिळालेल्या वर्णनानुसार ५ संशयित आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. प्रारंभी टाळाटाळ करणाऱ्या आरोपींनी विश्वासात घेतल्यानंतर गुन्ह्याची कबुली दिली व सोबत २ विधिसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग असल्याचे मान्य केले.

तपासादरम्यान आरोपींकडून चोरीसाठी वापरण्यात आलेले २ लाख रुपये किमतीचे अशोक लेलँड 'दोस्त' मालवाहू वाहन, तसेच ७ लाख ६५ हजार रुपये किमतीचे गौतम कंपनीचे १०२ सोलार प्लेट आणि १ लाख १३ हजार १९० रुपये किमतीचे १४७ धातूचे सोलार पॅनल स्ट्रक्चर अँगल असा एकूण १० लाख ७८ हजार १३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोना अनंत चमके करीत आहेत.

ही कारवाई अतुल कुलकर्णी (पोलीस अधीक्षक), प्रितम यावलकर (अपर पोलीस अधीक्षक), संकेत देवळेकर (उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर उपविभाग), राहुल आत्राम (परिविक्षाधीन सहायक पोलीस अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली, राहुल देशपांडे (पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका पोलीस ठाणे) यांच्या नेतृत्वाखाली पोहवा राहुल महिंद्रकर, पोना अनंत चमके, पोना लालसिंग राठोड, पोकों पैंगबर नदाफ, पोको वैभव सूर्यवंशी व पोको सागर शिवे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या बजावली.

# जिजा पाटकर सर्वोत्कृष्ट विद्यार्थी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार-पाटकर यांची मुलगी कु.जिजा ज्योतिर्लिंग पाटकर हिचा इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल हिला शाळेकडून सन 2025-26 करिता सर्वोत्कृष्ट विद्यार्थी (बेस्ट स्टुडन्ट फॉर द इयर 2025-26) या सन्मानाने सन्मानित करण्यात आले आहे.

कु.जिजा ज्योतिर्लिंग पाटकर ही अभ्यास ,खेळ, विविध स्पर्धात्मक परीक्षा यामध्ये अग्रेसर असल्यामुळे शाळेकडून तिला सन्मानित करण्यात आले आहे. तिच्या आई श्रीमती वीणा पवार पाटकर या सध्या अतिरिक्त आयुक्त सोलापूर महानगरपालिका म्हणून कार्यरत आहेत तसेच वडील ज्योतिर्लिंग गणपत पाटकर हे उप अभियंता म्हणून जलसंपदा विभागामध्ये कार्यरत आहेत .

इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त बेस्ट स्टुडन्ट फॉर द इयर 2025- 26 हा अवॉर्ड घोषित केला गेला ,या निमित्ताने अतिरिक्त आयुक्त वीणा पवार या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या व भारत देशासाठी आपले सैनिक ज्याप्रमाणे जीवाची कोणतीही पर्वा न करता आपल्या सीमारेषेचे रक्षण करत असतात त्याचप्रमाणे आपणही एक चांगले नागरिक म्हणून देशाच्या प्रगतीला हातभार लावला पाहिजे असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर त्यांची मुलगी जिजा हिला मिळालेल्या सन्मानाबाबत त्या म्हणाल्या की प्रत्येक पालकाला आपला मुलगा किंवा मुलगी मोठ्या यशाच्या शिखरावर जावे असे वाटत असते त्यासाठी पालक सातत्याने तळमळीने प्रयत्न करत असतात मुलांनी सुद्धा आपल्या पालकांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपड केली पाहिजे. त्यांच्या मुलीला मिळालेला पुरस्कार हे केवळ त्यांच्या कुटुंबीयांचे यश नसून इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे संचालक अमोल जोशी, श्रीमती सायली जोशी मॅडम ,श्रीमती मानसी जोशी,मुख्याध्यापिका व श्रीमती वळसे टीचर, श्रीमती जोशी टीचर,श्रीमती प्रीती स्वामी टीचर, हॉकी प्रशिक्षक अजय चाबुकवार तसेच सर्व शिक्षक यांचे यश आहे. त्याच्या मुलीच्या जडणघडणीमध्ये इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल चा सिंहाचा वाटा आहे असे त्यांनी सांगितले. प्रत्येक विद्यार्थी हा कुटुंबापेक्षा शाळेत जास्त कालावधी वेळ घालवतो त्यामुळे त्यांच्या जडणघडनी मध्ये ,त्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये शाळा महत्वपूर्ण योगदान देत असते.

खरे अभिनंदन तर शाळेचेच केलं पाहिजे जे आदर्श विद्यार्थी घडवतात असं त्या यावेळी म्हणाल्या.

# राज्याचं स्पष्टवक्ते आणि अभ्यास असणारं नेतृत्व हरपलं - चेतनसिंह केदार सावंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** अजितदादा पवार हे राज्याचे अभ्यासू आणि स्पष्टवक्ते प्रशासनावर फकड असलेलं नेतृत्व होतं. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने एक अभ्यासपूर्ण नेतृत्व हरपले असून महाराष्ट्राचे मोठं नुकसान झालं आहे. राज्याचं स्पष्टवक्ते आणि अभ्यास असणारं नेतृत्व हरपलं अशा शब्दात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी श्रद्धांजली वाहिली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती विमानतळावर बुधवारी सकाळी घडलेल्या भीषण विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत असून सर्वजण शोकसागरात बुडाले आहेत. आज महाराष्ट्रासाठी काळा दिवस असून राज्याची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. महाराष्ट्र राज्याचे कणखर, कार्यक्षम आणि खमके नेतृत्व लाभलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचं अकाली निधन अत्यंत दुर्दैवी आणि मनाला खोल वेदना देणारं आहे. अजितदादा आपल्यातून निघून गेले आहेत, ही गोष्ट मन अजूनही स्वीकारायला तयार नाही. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, प्रश्नांची जाण असलेला अशा प्रकारचा हा नेता होता. अजितदादा अतिशय संघर्षशील नेतृत्व होतं आणि सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं असं व्यक्तिमत्व होतं. ज्या वेळी महाराष्ट्राच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देत असताना अशा काळात त्यांचं निघून जाणं हे अविश्वसनिय मनाला चटका लावणारं आहे.

'मनाला वेदना देणारी आणि मनाला चटका लावून जाणारी अतिशय दुर्दैवी घटना आज महाराष्ट्रात घडली आहे. हे खरंतर कोणाच्या स्वप्नातही वाटलं नसेल, अजितदादा एवढ्या लवकर आपल्यातून जातील ही महाराष्ट्रासाठी अतिशय दुःखद आणि दुर्दैवी घटना आहे. अजितदादा गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाचे नेतृत्व करत होते, अतिशय परखड स्पष्टवक्तेपणा आणि प्रशासनावर असलेली त्यांची पकड असलेला नेता होता. बारीक गोष्टीचा अभ्यास करून बोलण्याची सवय होती, परखड स्पष्टपणा आणि निर्भीडपणे, रोखठोकपणे बोलणारा नेता राज्याने गमावला अशा शब्दात भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सहवेदना व्यक्त केल्या.

# कुमठ्यात वाहिली अजितदादांना श्रद्धांजली



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठयाशी अजितदादांचे जिव्हाळयांचे संबंध होते या गावातील अगदी ब्रम्हदेवदादा यांच्या पासुन ते दिलिपराव माने यांचे पर्यंत अत्यंत जिव्हाळयाचे संबंध होते. मागील सहा सात महिन्या पुर्वीच दादा कुमठे मध्ये येवुन गेले होते.

दादांचा स्नेह हा या गावातिल अनेकांशी होता. आज दादा गेल्याचे दुंख न सहन होनारे आहे, असे दुखद मत नगरसेवक जयकुमार माने यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करुन आपली भावना व्यक्त केली या प्रसंगी गावातिल जेष्ठ मंडळी नागनाथ माने, गुरुसिद्ध कस्तुरे, चंद्रकांत लिंबीतोटे, तसेच तानाजी शिनगारे, हजरत शेख, हसन शेख,चंद्रकांत फुलमाळी, उमेश बरबडे, विठ्ठल म्हेत्रे,राजु मायनाळे, युवराज चव्हाण, विश्वनाथ भोपळे,देविदास राठोड, बाबु जाधव, राम माने ,साताप्पा भद्रशेट्टी, रमेश नायकुडे, संजय गरड, महादेव कोळी, जिलाणी शेखव नजीर शेख कुमठे ग्रामस्थांनी भावपुर्ण साश्रुनयनांनी श्रद्धांजली वाहीली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि मंचकडून गिरीश महाजन यांचा जाहीर निषेध



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि मंच, सोलापूर यांच्या वतीने नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या कथित मनुवादी भूमिकेचा जाहीर निषेध करण्यात आला असून, त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आज जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तसेच वन अधिकारी जाधव ताई यांच्यावर प्रशासनाकडून कोणतीही अन्यायकारक कारवाई करण्यात येऊ नये, यासाठीही स्वतंत्र निवेदन सादर करण्यात आले. जर जाधव ताई यांच्याविरोधात कोणतीही कारवाई झाली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि मंच रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

या वेळी मंचचे अध्यक्ष ॲड. शताब्दीकुमार मधुकर दोडयानुर, ज्येष्ठ सदस्य ॲड. संजीव सदाफुले, अजय रणशृंगारे, उपाध्यक्ष विक्रम वाघमारे, कार्याध्यक्ष रविराज सरवदे, सचिव दीपक हुलसुरे, प्रथम गायकवाड, ॲड. राहुल गायकवाड, ॲड. जयप्रकाश भंडारे, ॲड. राजरत्न बनसोडे, ॲड. सत्यजित वाघमारे, ॲड. विशाल मस्के, राज दोडयानुर यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# महाराष्ट्राचा विकासपुरुष हरपला, खरंच आमचा बाप माणूस गेला- नगरसेवक किसन जाधव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात विकासाचा दूरदृष्टीकोन घेऊन चालणारा, कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा आणि संपूर्ण राज्याला कुटुंब मानणारा नेता आज हरपला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या रूपाने आम्ही केवळ एक नेता नाही, तर आमचा बाप माणूस गमावला आहे, अशी अत्यंत भावनिक प्रतिक्रिया नगरसेवक किसन जाधव यांनी व्यक्त केली बुधवारी सकाळी बारामती विमानतळावर झालेल्या विमान अपघातात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दुःखद निधन झाल्याची बातमी समजताच संपूर्ण देशासह महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक चाणक्य, दूरदृष्टी असलेला आणि विकासाची घोडदौड अविरत सुरू ठेवणारा नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. नगरसेवक किसन जाधव पुढे म्हणाले की, अजित पवार हे केवळ पदावरचे नेते नव्हते, तर कार्यकर्त्यांना बळ देणारे, विश्वास देणारे आणि वेळप्रसंगी कुटुंबप्रमुखासारखी जबाबदारी घेणारे नेतृत्व होते. मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत सक्रिय कार्यकर्ता असताना तसेच सोलापूर जिल्हा नियोजन समितीचा सदस्य म्हणून काम करत असताना, केवळ आणि केवळ अजित पवार यांच्या कृपा व आशीवार्दामुळेच ही जबाबदारी निभावू शकलो. प्रभाग क्रमांक २२ च्या विकासासाठी त्यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. विकासकामांच्या बाबतीत त्यांनी कधीही नकार दिला नाही. एक आपुलकीचा, कुटुंबातील सदस्याप्रमाणे माज्याशी त्यांचे नाते होते. त्यामुळे आज निर्माण झालेली ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात असा नेता पुन्हा होणार नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आज घरातला कुटुंबप्रमुखच हरपल्यासारखं वाटत आहे. त्यांच्या प्रेमावर, विश्वासावर आणि मार्गदर्शनावर आम्ही उभे होतो. त्यांच्या विकासात्मक धोरणांवरच आजपर्यंत काम केलं आणि पुढील काळातही त्यांच्याच दूरदृष्टीच्या विचारांनी काम करत राहू, असे सांगताना किसन जाधव यांचे मन दुःखाने भरून आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मी खूप जवळून पाहिले. माज्यावर त्यांचे विशेष प्रेम व विश्वास होता. त्यांचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मी नेहमी प्रामाणिकपणे काम केले. त्यांचे आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी राहतील, असा भावनिक विश्वासही त्यांनी व्यक्त केला. खरंच, आज आमचा बाप माणूस निघून गेला आहे, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी जाधव-गायकवाड आणि इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 163

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | | | 4 | 2 | 9 | 1 | 5 |
| 1 | 3 | | 5 | | 8 | | 2 | |
| 5 | | 2 | | | | | 8 | 3 |
| 4 | | 3 | | | | 8 | 7 | |
| | 6 | 7 | | | 1 | 3 | | |
| | | | | | | 2 | 5 | |
| | | 4 | 6 | | 5 | | 3 | |
| 6 | | 1 | | | 4 | 5 | | 8 |
| | 8 | | 2 | | | | | 4 |

# श्री विठ्ठल कारखान्याचे वतीने कै. अजितदादा पवार यांना भावपुर्ण श्रध्दांजली



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री कै. अजितदादा पवार यांचे आज सकाळी ९.४६ वाजता विमान अपघातामध्ये दुदैवी निधन झाले. कै. अजितदादा पवार यांना श्री विठ्ठल कारखान्याचे वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड यांनी कै. अजितदादा पवार यांचे विषयी शोक व्यक्त करताना म्हणाले की, महाराष्ट्रासाठी आजचा दिवस काळा दिवस म्हणून कायम स्मरणात राहिल. दादा हे स्पष्टवक्ता व निर्भीड असे व्यक्तीमत्व होते. ते एक धुरंधर व अभ्यासू राजकारणी होते. त्यांचे जाण्याचे कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांचे कुटुंबीय व महाराष्ट्रातील सर्व जनतेला दुःख सहन करणेची ईश्वर शक्ती देवो व त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना करणेत आली. सदर प्रसंगी कारखान्याचे संचालक सर्वश्री धनंजय काळे, वर्क्स मॅनेजर यु.के.तावरे, केन मॅनेजर ए.डी.वाघ, चिफ केमिस्ट बी. आर. माने, फायनान्स मॅनेजर एन. बी. शिंदे, चिफ अकौंटंट ओ.एस. शिंदे, डिस्टीलरी मॅनेजर एन. एस. सोळंके, लेबर ॲण्ड वेल्फेअर ऑफिसर बी.एस.पाटील, मुख्य शेती अधिकारी ए. व्ही. गुळमकर, परचेस ऑफिसर ए. एस. ऐनापुरे, कारखान्याचे जेष्ठ सभासद हणमंत पाटील यांचेसह कारखान्याचे सभासद, ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पापय्या तालीम संघात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** २६ जानेवारी २०२६ रोजी पापय्या तालीम संघाच्यावतीने जुनी मिल कंपौड येथील ऐतिहासिक वारसा पापय्या तालीमच्या प्रांगणात ७७ वा प्रजासत्ताक दिन भव्य व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे चंडक प्रशालेचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह व संस्थेचे माजी उपाध्यक्ष मा.श्री. जयंत मोरे सर यांच्या शुभहस्ते व संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, सेक्रेटरी शिवाजी चटके, सह सेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार प्रकाश सुरवसे, वस्ताद वसंत कुलकर्णी, सदस्य गजानन लामकाने, किरण बायस, प्रकाश पवार, बंडू कदम यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी सुरेश जानकर, कृष्णा जोशी, अमोल जाधव, अतुल कोथींबीरे, संजय हिरळीकर, कन्हैय्या मुक्ता, श्रीनिवास कोटा, रणजीत खताळ, जालिंदर काटकर, संभाजी मळगे, बबन झिंगाडे, सागर शिंदे, अजय रणवे, प्रकाश जाधव, महेश पवार, साहिल नरळे, यश नागणे, संतोष अंजिखाने, यश डांगे, सिध्देश्वर आयवळे, रविकांत जाधवआदी सभासद व्यायामपटू व क्रीडाप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक विजय पाटील व सुत्रसंचालन गणेश कुलकर्णी यांनी केले तदनंतर पाहुण्यांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आली.

# पंढरपूर तालुक्यातील दोन लाख 85 हजार ८२७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी तालुक्यातील एक लाख ४८ हजार ९०२ पुरुष मतदार तर एक लाख ३६ हजार ९१९ स्त्री मतदार तसेच इतर ०५ अशा एकूण दोन लाख ८५ हजार ८२७ मतदारांचा समावेश असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन लंगुटे यांनी दिली.

जिल्हा परिषदेचा करकंब गटासाठी सर्वसाधारण आरक्षण असून ३६ हजार ७०८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये उंबरे गण (सर्वसाधारण) १७ हजार २२० , करकंब गण (सर्वसाधारण) १९ हजार ४८८ इतके मतदार आहेत.भोसे गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३२ हजार ५८५ मतदार आहेत. त्यामध्ये भोसे गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १८ हजार २३५, गुरसाळे गण (सर्वसाधारण) १४ हजार ३५० असे मतदार आहेत.

रोपळे गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३८ हजार ६४८ इतके मतदार आहेत. त्यामध्ये रोपळे गण(सर्वसाधारण महिला) १८ हजार ६३५ , सुस्ते गण (अनुसूचित जाती महिला) २० हजार १३ असे मतदार आहेत. गोपाळपूर गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे.

या गटात ३५ हजार १६४ मतदार आहेत. यामध्ये पुळूज गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला) १९ हजार ४३४, गोपाळपूर गण (सर्वसाधारण महिला) १५ हजार ७३० मतदारांचा समावेश आहे.

वाखरी गट सर्वसाधारण महिला आरक्षित आहे. या गटात ३३ हजार ७४२ इतके मतदार आहेत. यामध्ये वाखरी गण (नागरिकांचा मागास प्रवर्ग) १६ हजार ९६४, पटवर्धन कुरोली गण (सर्वसाधारण महिला) १६ हजार ७७८ इतके मतदार आहेत. भाळवणी गट अनुसूचित जाती महिला आरक्षित आहे. या गटात ३४ हजार ४८ इतके मतदार आहेत. यामध्ये भाळवणी गण(नागरिकांचा मागास प्रवर्ग )१६ हजार ४०८, पळशी गण (अनुसूचित जाती महिला) १७ हजार ६४० इतके मतदार आहेत.

टाकळी गट अनुसूचित जाती आरक्षित आहे. या गटात ४० हजार ८८५ इतके मतदार आहेत. यामध्ये टाकळी गण (सर्वसाधारण) २० हजार २६५ , खर्डी गण(अनुसूचित जाती) २० हजार ६२० इतके मतदार आहेत. कासेगाव गट नागरीकांचा मागासवर्ग आरक्षित असून या गटात ३४ हजार ४७ इतके मतदार आहेत. यामध्ये कासेगाव गण (सर्वसाधारण)१७ हजार १५०, सरकोली(सर्वसाधारण महिला) १६ हजार ८९७ इतके मतदार आहेत.

# विठ्ठल परिवाराचा आधारवड हरपला
## पंढरपुरात अजितदादांना श्रद्धांजली



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त समजताच संपूर्ण महाराष्ट्रासह पंढरपूर तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

आपल्या रोखठोक स्वभावासाठी आणि विकासकामांच्या धडाक्यासाठी ओळखले जाणारे 'दादा' आता आपल्यात नाहीत, या कल्पनेनेच कार्यकर्ते सुन्न झाले आहेत. पंढरपूर येथे सहकार शिरोमणी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या संपर्क कार्यालय येथे शोकसभेचे आयोजन करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी अत्यंत भावूक होत कल्याणराव काळे म्हणाले की, "अजितदादांनी विठ्ठल परिवाराला आणि आम्हाला प्रत्येक संकटात आणि कामात मोलाची मदत केली. सत्तेत असो वा नसो, दादांनी नेहमीच कार्यकर्त्याला बळ दिले.

त्यांच्या जाण्याने राजकारणातील एक धगधगता ज्वालामुखी शांत झाला असून, आमच्यासाठी ही कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. आजचा दिवस येईल हे स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते"

या श्रद्धांजली सभेला विठ्ठल परिवारातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात प्रामुख्याने:

गणेश पाटील, युवराज पाटील, समाधान काळे भारत कोळेकर यांच्यासह विठ्ठल परिवारातील विविध संस्थांचे संचालक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली वाहिली. दादांच्या आठवणींना उजाळा देताना अनेकांना अश्रू अनावर झाले होते.

# श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रीय नागरी पतसंस्थेने 500 कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला - चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील सहकार क्षेत्रात अत्यंत नावाजलेली पतसंस्था म्हणून ज्याचे नाव घेतले जाते शिवाय महाराष्ट्र शासनाचे सहकारनिष्ठ पुरस्कार मिळवलेले श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रीय नागरी पतसंस्थेने आपला एकूण 500 कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला असल्याचे चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी यांनी सांगितले.

जोडभावी पेठ कन्ना चौक येथील तोगटवीर क्षत्रीय नागरी पतसंस्थेने एकूण 500 कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम उपस्थित होते.

व्यवसाय उद्दिष्ट पूर्तीचे सर्व श्रेय ज्यांनी आमच्या संस्थेत अत्यंत विश्वासाने ठेवी ठेवल्या अशा ठेवीदार, खातेदार आणि कर्जदार अशा ग्राहकांना जातो.

संस्थेचे संपत्ती स्थिती मजबूत असून सोलापूर शहरातील ग्राहकांचा विश्वास वाढला आहे. एकूण ठेवी 262 कोटी असून कर्जे 238 कोटी इतकी झालेली आहे. आणि यामध्ये जास्तीत जास्त सोने तारण कर्ज असून ग्राहकांनी सोने तारण कर्ज मिळविण्यासाठी अगदी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे इथे नमूद करावे लागेल. तसेच आमच्या संस्थेचे खेळते भांडवल 312 कोटी इतकी आहे.

महाराष्ट्र शासन दरबारी अनेक वेळा आमच्या पतसंस्थेची दखल घेतली गेली असून व्यवसायाचे अनेक पुरस्कार आमच्या संस्थेला मिळाले असल्याचे चेअरमन यांनी सांगितले.

संस्थेच्या प्रगतीत शाखा अधिकारी कर्मचारी आणि संचालक मंडळाचा मोठा वाटा आहे. संचालक मंडळ कोणतेही मानधन न घेता कोणते कर्ज न घेता कजार्ला जामीन न राहता येथे सेवा बजावीत असतो. त्यामुळे संस्थेचा एनपीए नेहमी झिरो आहे आणि तशी काळजी घेतली जाते.

या कार्यक्रमाचे प्रस्तावना चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी यांनी केले तर तर आभार व्हाईस चेअरमन विलास बडगंची यांनी मानले. तर सूत्रसंचालन मुख्य व्यवस्थापक राजेंद्र उदगीरी यांनी केले. यावेळी संस्थापक रामचंद्र पूडूर, अरुण चिंता, रामकृष्ण उदगिरी, डॉ. नारायण रंगम विद्यमान संचालक मंडळ विठ्ठल बडगंची, अरविंद पुडूर, विष्णू म्याकल, मोहन खंडे, नरेंद्र बत्तूल, मल्लिकार्जुन खंडे, अजय रंगम, चंद्रकांत रंगम, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड, भगवंत फलमारे , ॲड. अंबादास कंदीकोंडा सर्व माजी संचालक तसेच व्यवस्थापक, उपव्यवस्थापक व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज : सहा. पोलीस अधीक्षक डगळे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, या माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहा. पोलीस अधीक्षक श्री.प्रशांत डगळे यांनी दिली.

माघ वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ३८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०२पोलीस उपअधिक्षक, १७ पोलीस निरिक्षिक, ७९ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ६८८ पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच आरसीपी, क्युआरटी, बीडीएस पथके, कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, भक्ती सागर (६५ एकर), महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉड स्थापन करण्यात आले असून, यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच ड्रोन द्वारे व १६२ सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी १० गामा पेट्रोलिंग व ९ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १३ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही सहा. पोलीस अधीक्षक श्री. डगळे यांनी केले आहे.

# अजितदादांच्या अचानक 'एक्झिट' मुळे उमेशदादांचा आधार कोसळला
## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनाची वार्ता येताच धाय मोकलून रडले उमेश पाटील



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** गेला आठवडाभरापासून निवडणुकीचे धावपळ परवा उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी कमी अधिक प्रमाणात थांबली... सुरू झाले प्रचाराचे नियोजन... वार बुधवार... दि. २९ नोव्हेंबर... सकाळचा प्रखर सूर्य उगवला... राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या मोहोळ येथील सावली बंगल्यावर कार्यकर्त्यांची वर्दळ सुरु झाली... तालुकाभर प्रचाराचे नियोजन उमेश दादा करत होते... वेळ सकाळी साडेआठची... कुणीतरी कार्यकर्त्यांनी सांगितले अजितदादांच्या विमानाचा अपघात झाला आहे... उमेश दादांच्या काळजाचा ठोकाच चुकला... सुरुवातीला काही मिनिटे बातमी खरी की खोटी...? यामध्ये गेले... अपघात झाला खरा, मात्र अजितदादा यामध्ये आहेत की नाहीत हे समजणे कठीण होते... पण, दुर्दैव... आजचा सूर्य उगवला होता आणि तिकडे राजकारणातील तेजस्वी सूर्याचा अंत झाला होता... बातमी उमेश दादांच्या कानावर आदळली आणि अश्रूंचा बांध फुटला... होत्याचं नव्हतं झालं होतं... सगळं संपलं होतं... धायमोकलून रडण्याशिवाय दुसरा पर्यायच उमेश दादांच्या समोर उपलब्ध नव्हता...

पवार कुटुंब आणि उमेश पाटील यांचं एक अतूट नातं. उमेश पाटील यांचा राजकारणातील प्रवेशच पवार कुटुंबीयांच्या छत्रछायेखाली झालेला. अभ्यासू वक्ता, राजकारणातील हजरजबाबीपणा, उत्कृष्ट संघटन कौशल्य, संघटना वाढीसाठी कार्यकर्त्यांना द्यावं लागणार स्पिरिट इतके सगळे असणारे उमेश पाटलांचे गुण ओळखून राष्ट्रवादीच्या युवक प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी उमेश दादांच्या खांद्यावर आली होती. त्यानंतर नरखेड जि.प. सदस्य, पक्षाचा मुख्य प्रवक्ता, वेगवेगळ्या जिल्ह्यांचे प्रभारी अशा अनेक जबाबदाऱ्यांचं ओझं अजित दादांनी उमेश पाटलांच्या खांद्यावर मोठ्या विश्वासाने टाकलं होतं.

दरम्यान, अनगरकर पाटील व नरखेडकर पाटील हे मुख्यतः राष्ट्रवादीचेच दोन प्रवाह. मात्र एका म्यानात दोन तलवारी राहिल्याच नाहीत. अजितदादांनी दोघांनाही नेहमीच बळ दिलं. अशातच विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले. कोणत्याही परिस्थितीत अनगरकरांच्या व्यासपीठावर जाणार नसल्याचा निर्णय राष्ट्रवादीच्या मुख्य प्रवक्ता पदाची जबाबदारी असणाऱ्या उमेश पाटलांनी घेतला. यावेळी एका भाषणात अजित पवार यांनी उमेश पाटलांना चांगलंच झापलं होतं. मात्र मोहोळ तालुका आणि मतदारसंघ हा राष्ट्रवादीच्या विचाराचा आहे हे उमेश पाटलांनी राजू खरे यांना निवडून आणून दाखवलं. याचं बक्षीस म्हणून अजित दादांनी पुन्हा एकदा उमेशदादा वर मायेचा पदर धरला आणि जिल्हाध्यक्ष पदाच्या जबाबदारीचा शिवाळ खांद्यावर दिलं.

पवार कुटुंबीय आणि खासकरून अजित दादांसोबत असलेले उमेश दादांचे जिव्हाळ्याचं नातं अनेक प्रसंगावरून अधोरेखित होतं. आज अजितदादांच्या निधनाची वार्ता कानावर पडताच धाय मोकलून रडण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय त्यांच्यासमोर नव्हता. दुःखाचं आभाळ उमेश दादांवर कोसळलं होतं. अश्रू ढाळत जिल्ह्यातील आणि राज्यातील अजितदादांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सावरण्यासाठी ते बळ देत होते. हे धीरगंभीर चित्र बघून कार्यकर्त्यांच्या डोळ्यांच्या कडा आसवांनी ओल्या झाल्या होत्या. मनावरून निसटलेला ताबा सावरत, जड अंतकरणाने हुंदके देत उमेश दादा बारामतीकडे रवाना झाले. राजकारणातील दादा माणसाला कायमचा निरोप देण्यासाठी... !

# बालाजी अमाईन्सला FICCI कडून 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' पुरस्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बालाजी अमाईन्स लिमिटेडला शाश्वत विकास (Sustainability) क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI) कडून प्रतिष्ठित 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

FICCI ही भारतातील एक जुनी व नामांकित औद्योगिक संघटना असून तिची स्थापना १९२७ साली झाली आहे. भारतीय उद्योगांचे प्रतिनिधित्व करत ही संस्था सरकारसोबत समन्वय साधून आर्थिक विकास, व्यापार, गुंतवणूक आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

FICCI केमिकल्स अँड पेट्रोकेमिकल्स अवॉर्ड्स २०२५ हा पुरस्कार सोहळा २२ जानेवारी २०२५ रोजी फेडरेशन हाऊस, नवी दिल्ली येथे पार पडला. 'सस्टेनेबिलिटी लीडर ऑफ द इयर' हा पुरस्कार बालाजी अमाईन्सला मिळाले असून, याच श्रेणीत रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि ट्रान्सपेक इंडस्ट्री लिमिटेड यांनाही या पुरस्काराने गौरविण्यात आले. मुख्य अतिथी श्रीमती अनुप्रिया पटेल, राज्यमंत्री, रसायन आणि खते तसेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या हस्ते बालाजी अमाईन्सच्या वतीने बालाजी स्पेशालिटी केमिकल्सचे संचालक जी. हेमंत रेड्डी यांनी पुरस्कार स्वीकारले. यावेळी अतिथी रसायन आणि पेट्रोकेमिकल्स विभागाच्या सचिव श्रीमती निवेदिता शुक्ला वर्मा उपस्थित होत्या.

बालाजी अमाईन्स लिमिटेडची स्थापना १९८८ साली झाली असून कंपनीने सुरुवातीला धाराशिव जिल्ह्यातील तामलवाडी येथे एका प्रकल्पाद्वारे अलिफॅटिक अमाईन्स उत्पादनास सुरुवात केली होती. गेल्या तीन दशकांत कंपनीने अमाईन्स, डेरिव्हेटिव्हज आणि स्पेशालिटी केमिकल्स क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वासार्ह उत्पादक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

सध्या कंपनीचे महाराष्ट्र व तेलंगणा राज्यात एकूण चार उत्पादन प्रकल्प कार्यरत असून ५० हून अधिक देशांमध्ये उत्पादनांची निर्यात केली जाते. भारतात प्रथमच काही उत्पादने विकसित करुन आयात पर्याय (Import Substitutes) म्हणून बाजारात आणण्याचा मानही कंपनीला मिळाला आहे. कंपनीकडे भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने मान्यता दिलेले इन-हाऊस R&D युनिट असून अनेक महत्त्वाची उत्पादने स्वतःच्या संशोधनातून विकसित करण्यात आली आहेत.

बालाजी अमाईन्सने पर्यावरण संवर्धनाला नेहमीच प्राधान्य दिले असून कंपनी Zero Liquid Discharge (ZLD) धोरण राबवते. उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणारा वेस्टेज / कचरा कमी करणे, संसाधनांचा पुनर्वापर आणि स्वच्छ ऊजेर्चा वापर यावर भर दिला जातो. कंपनी ९० टक्के सांडपाण्याचे शुद्धीकरण करून पुनर्वापर करते व केवळ १० टक्के ताज्या पाण्याचा वापर करते. आपल्या वीज गरजेचा मोठा भाग कंपनी स्वतःच्या सौर व पवन ऊर्जा प्रकल्पांतून पूर्ण केला जातो, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात मोठी घट झाली आहे. तसेच, हायड्रोजन वायूचा पुनर्वापर स्वच्छ इंधन म्हणून केला जातो व ७५ टक्के पुनर्वापरयोग्य पॅकेजिंग साहित्य वापरले जाते.

यावेळी बोलताना व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी म्हणाले, "हा पुरस्कार म्हणजे स्वच्छ आणि हरित पर्यावरणासाठी आम्ही केलेल्या प्रयत्नांची पावती आहे. आमचे अध्यक्ष ए. प्रताप रेड्डी यांच्या दूरदृष्टीमुळेच आम्हाला अत्याधुनिक तंत्रज्ञान व यंत्रसामग्रीमध्ये गुंतवणूक करुन पर्यावरणावर होवू शकणारे दुष्पपरिणाम कमी करता आले. आम्ही राबवलेले पर्यावरणपूरक उपक्रम इतर उद्योगांसाठी एक आदर्श ठरतील."

# विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशी करा-पाटील



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे कुशल प्रशासकीय नेतृत्व आणि खंदे नेतृत्व अजित पवार यांचा आज, बुधवारी (ता.२८) विमान अपघातात दुदैवी मृत्यू झाला.पवारांसारखा मोठ्या नेत्याची 'अकाली एक्झिट' सर्वसामान्यांच्या मनाला चटका लावून जाणारी आहे.विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी यानिमित्ताने भारत अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी केली आहे.यासंदर्भात पाटील यांनी पुण्याचे पोलीस आयुक्तांना कायदेशीर नोटीस बजावत चौकशीची मागणी केली आहे.

भारत अगेन्स्ट करप्शनला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्वच क्षेत्रात सहकार्य करीत त्यांच्या सामाजिक कार्याची दखल अजित दादांनी घेतली होती. दादांचे सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कर्तृत्व, नेतृत्व सर्वमान्य होते.राज्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसला शरद पवारांनंतर वाढवण्याचे काम अजित दादांनी केले आहे. अशात अचानक विमान अपघातात दुदैवी मृत्यूमुळे घातपाताची शक्यता नाकारता येवू शकत नाही, असे मत पाटील यांनी व्यक्त करीत चौकशीची मागणी केली आहे. दादांच्या कुशल प्रशासकीय नेतृत्वाचा महाराष्ट्राला सदैव अभिमान राहील.

अजित दादा हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक अत्यंत अभ्यासू आणि स्पष्टवक्ते व्यक्तिमत्त्व होते. अनेकदा उपमुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळताना त्यांनी राज्याच्या विकासाला जी गती दिली, ती कौतुकास्पद आहे आणि सदैव स्मरणात राहील, असे पाटील म्हणाले. पहाटेपासून कामाला सुरुवात करण्याची दादांची पद्धत आणि फाईल्सचा त्वरित निपटारा करण्याच्या कौशल्यामुळे प्रशासन गतिमान झाले, पायाभूत सुविधा, शेती आणि उद्योगांच्या संदर्भात त्यांनी घेतलेले निर्णय राज्याला प्रगतीपथावर नेणारे ठरले. तसेच ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करून ते सोडवण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला, असे हेमंत पाटील म्हणाले.